**कृपया प्रसिध्दीसाठी** **27 एप्रिल 2009**

## राम नाईक यांना विजयाचा आत्मविश्वास;
## प्रचार यात्रांचा अंतिम टप्पा पूर्ण

**मुंबई, सोमवार :** उत्तर मुंबईच्या भागा-भागात फिरुन थेट मतदारांपर्यंत जाऊन गेले एक महिना भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार श्री राम नाईक प्रचार करीत होते. या प्रचार यात्रांचा अंतिम टप्पा आज सकाळी पूर्ण झाला असून श्री राम नाईक यांनी विजयाचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

"30 एप्रिलचा एक दिवस तुम्ही मला द्या, मी तुम्हाला पुढची पाच वर्षे देईन." असे आश्वासन या प्रचार यात्रांमधून श्री. राम नाईक देत होते. 27 मार्च रोजी गुढीपाडव्याच्या दिवशी श्री. राम नाईक यांनी आपल्या निवडणूक प्रचाराचा शुभारंभ केला होता. आज अक्षय तृतीयेच्या दिवशी श्री. नाईक यांनी प्रचार आज पूर्ण केला. उत्तर मुंबईमध्ये एकूण 38 महापालिका वॉर्ड असून आपल्या परिवर्तन रथावरुन या सर्व वॉर्डांमध्ये श्री. राम नाईक यांनी प्रचार यात्रा केल्या. त्याचवेळी उत्तर मुंबईत इतरत्र आमदार श्री. गोपाळ शेट्टी, शिवसेना विभागप्रमुख श्री. विनोद घोसाळकर, माजी राज्यमंत्री श्री. भाई गिरकर, श्री. आर. यु. सिंह, श्री. जयप्रकाश ठाकुर, श्री. अतुल भातखळकर यांजसारखे परिष्ठ भाजपा नेते तसेच भाजपा-शिवसेना युतीचे अन्य महत्त्वाचे पदाधिकारी व नगरसेवक व अन्य नेते राम नाईक रथावरुन प्रचार यात्रांद्वारे मतदारांशी संपर्क साधत होते. आज वॉर्ड क्र. 30 मध्ये अली तलाव, मनपा कॉलनी, जुने कलेक्टर कंपाऊंड, बुद्ध नगर, न्यू महाकाली नगर, चारकोप नाका, वळणई वसाहत या भागांमधून श्री. नाईक यांनी प्रचार केला. यावेळी बोलताना श्री. नाईक यांनी मतदारांना आवाहन केले की मी केलेले काम तुमच्या समोर आहे. लोकसेवा करणा-याला तुम्ही लोकसभेत पाठवणार की वैयक्तिक स्वार्थासाठी पक्षद्रोह करणा-या श्री. संजय निरुपम, श्री. शिरिष पारकर यांना मते देणार ते तुम्हीच ठरवा. यावेळी नागरिकांनी 'जो लोकसेवत तोच लोकसभेत' असा जयघोष करुन श्री. राम नाईक यांच्या विजयाची ग्वाही दिली.

महिनाभर चाललेल्या निवडणूक प्रचारामध्ये सगळीकडेच श्री. नाईक यांना जनतेकडून जोरदार प्रतिसाद मिळत आहे. श्री. उद्धव ठाकरे, श्री. गोपीनाथ मुंडे, श्री. नितिन गडकरी, श्रीमती जयवंतीबेन महेता आदी सर्वच नेत्यांच्या सभांनाही मतदारांनी अलोट गर्दी केली होती. या सर्वांमुळेच श्री. राम नाईक यांचा उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातून विजय निश्चित मानला जात आहे. स्वतः श्री. राम नाईक यांनीही मतदारांना "आपला पाठिंबा मतपेटयांमधून दाखवून द्या. भरघोस मतदान करुन भाजप-शिवसेना युतीला विजयी करा," असे आवाहन केले आहे.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दि प्रमुख**
**मोबाईल क्र. 9867689540**